# ।। अथ मूळ प्राण उत्पत को अंग ।।

## मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ मूळ प्राण उत्पत ग्रंथ लिखन्ते ।।

।। कवत्त ।।

एक समय धर्म रायजी ।। बैठा पलक लगाय ।।
मनछा देवी गेब सूं ।। करमे पीव उपाय ।।
धर्म राय मन सोचियो ।। अब प्रसण हे पीव ।।
प्रसादी मो कूं दई ।। सिष जुगे जुग जीव ।।
प्रसादी पाया पछे ।। कै जुग बीता जाण ।।
जन सुखिया तब धर्म कूं ।। गेब वाज हुई आण ।।१।।

एके वेळी धर्मराय ध्यान लावून बसले होते,परमात्म्याने इच्छादेवीला गेबऊ(अचानक) धर्मरायाच्या हातात प्रगट केली तेव्हा धर्मरायाने मनात विचार केला की,परमात्मा माझ्यावर प्रसन्न आहे आणि युगांयुगा पर्यंत जीवंत राहण्याची प्रसादी(प्रसाद)देवून राहिले आहे तेव्हा धर्मरायाला आकाशवाणी झाली(ऐकू आली).।।१।।

एक समे धर्म राय ।। पलक सु पलक लगाई ।।
मनछा देवी पीव ।। गेब सूं पास पढाई ।।
धर्मराय मन हरक ।। पीव किरपा सिर कीवी ।।
जुगे जुग की आस ।। मोय प्रसादी दीवी ।।
बोत जुग परले गया ।। बोत जुग जां होय ।।
जन सुखिया तब धर्म कूं ।। साहेब पूछा जोय ।।२।।

एके वेळी धर्मराय ध्यान लावून बसले होते,परमात्म्याने इच्छाशक्तीला गेबऊ(अचानक) पाठवले,धर्मरायाला मनातून प्रसन्नता झाली की,परमात्म्याने माझ्यावर कृपा केली आहे युगां युगापासून मी आशा लावून बसलो होतो,ती प्रसादी मला दिली.याच्या नंतर कित्येक युग पुढे होवून राहिले आहेत,तेव्हा धर्मरायाला परमात्म्याने विचारले.।।२।।

अलख निरंजन देव ।। गेब मुख बोले बाणी ।।
मनछा देवी सूंप ।। धर्म सूं कह बखाणी ।।
हम सूंपी तम चीज ।। नाय तुम काहा बणायो ।।
धर्म कह कर जोड़ ।। पीव प्रसाद जूं पायो ।।
ज्याँ डाकी विक्राळ ।। ब्रम्ह ले उबाज सुणाई ।।
जन सुखिया तब धर्म ।। कह किम भुग तुं जाई ।।३।।

अलख निरंजन निराकार ब्रम्ह आकाशवाणीद्वारा धर्मरायाशी बोलले की,आम्ही इच्छा–शक्तीला तुला सोपवली होती,त्या इच्छाशक्ती पासून तु काही बनवले नाही.धर्मरायने हात जोडून म्हटले की,मला तर परमात्म्याकडून प्रसाद मिळाला आहे,तेव्हा निरंजन

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

निराकार ब्रम्ह आकाशवाणी द्वारा तेज बोलले की,इच्छाशक्तीला सोबत घेवून उत्पत्ती करा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तेव्हा धर्मरायाने सांगितले की,मी याचा उपयोग कसा करु.।।३।।

धर्म राज कर जोड़ ।। पीव सुं अर्ज सुणावे ।।
हर बोल्या सो बेण ।। पीव खाली नहि जावे ।।
किस बिध भुगतु जाय ।। सोच मन माय उपायो ।।
हर किरपा कर भेव ।। धर्म कूं आण सुणायो ।।
तिरगुण कर पैदास ।। जीव बोहो भाँत उपावो ।।
जन सुखिया घड़ मांड ।। उलट भांडा तुम खावो ।।४।।

धर्मराजाने निरंजन ब्रम्हला हात जोडून प्रार्थना केली,आपली आज्ञा मला स्वीकार आहे, परंतु मी इच्छाशक्तीचा उपयोग कसा करु,हे माझ्या समजमध्ये येत नाही आहे.निरंजन निराकार ब्रम्हने कृपा करुन,धर्मराजला हा भेद आकाशवाणीद्वारा ऐकवला की,तीन गुण म्हणजे ब्रम्हा,विष्णु,महादेवाला उत्पन्न करुन कित्येक(अनेक)प्रकारच्या जीवांना उत्पन्न करा आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,संसाराची रचना करुन तुम्ही त्याचे भाडे खा म्हणजे सुख घे(घ्या).।।४।।

भुगतो जाय सराप ।। बेण साचो कर ल्यावो ।।
होय उजियागर भुगत ।। फेर पाछा तुम आवो ।।
धरम कह मुख बेण ।। मोय बळ नाय गुसांई ।।
तिरगुण किम प्रकास ।। करणगत कहिये सांई ।।
सायब गेब अवाज ।। धर्म कूं भेव सुणायो ।।
जन सुखिया इतबार ।। धर्म कूं तोय न आयो ।।५।।

एक तर वरील प्रकाराने उत्पत्ती करा अन्यथा शाप भोगा,माझ्या वचनाला खरे करा आणि माझ्या सांगितल्यानुसार कार्य करुन,परत या धर्मरायने तोंडाने बोलून प्रार्थना केली,हे नाथ,माझ्यात ही शक्ती नाही.ब्रम्हा,विष्णू,महादेव या तिन्ही गुणांना कसे पैदा करु हे समजवा.तेव्हा परमात्म्याने धर्मराजला आकाशवाणीद्वारा त्रिगुणांना उपजविण्याचा भेद ऐकवला.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,यावर ही धर्मरायला विश्वास झाला नाही.।।५।।

सेंस पांख को कंवळ ।। ताय मे एक बताई ।।
धर्म राय व्हा लीन ।। ओर सब कह पलाई ।।
निर्बळ बळ तज जाय ।। तोड पासे जब लीवी ।।
सायब अंतर आय ।। धरम पर किरपा कीवी ।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

ओऊँ शब्द उचार ।। धर्म बोल्या इण बाणी ।।
जन सुखिया तब सगत ।। गरभ मे कह बखाणी ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,हजार पाकळीच्या कंवल(कमळमध्ये)एक शब्द सांगितला,धर्मराय त्याच्यात लीन होवून गेला आणि सर्व सांगितले,जेव्हा आपल्या बळाला सोडून निर्बल होवून गेला,तेव्हा धर्मरायच्या अंतरात शब्दाची जागृतीची कृपा केली.ओअम शब्दाचा विचार करुन धर्मराय बोलले,तेव्हा शक्तीने हे सांगितले,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।६।।

ओऊँ शब्द प्रकास ।। सगत कूं पास बुलाई ।।
तुम हम अेकई होय ।। मांड की करां उपाई ।।
इत उत शब्द प्रकास ।। बिच अेक पुरष उपाया ।।
ता लेणे के काज ।। ऊठ दोनु तछ धाया ।।
बोल्यो सिसु ले ताण ।। हात समसेर संभाई ।।
जन सुखिया केहे बेण ।। तुम संग चलूं न भाई ।।७।।

ओअम शब्दाचा प्रकाश झाला तेव्हा शक्तीला जवळ बोलवले आणि सांगितले,तू आणि आम्ही दोन्ही सोबत मिळून संसार रचण्याचा उपाय करु.इकडे तिकडे शब्दाचा प्रकाश झाला तेव्हा मध्येच एक पुरुष पैदा केला,त्याला घेण्याकरीता दोन्ही उठून पळाले,तेव्हा पैदा होणाऱ्या बालकाने हातात तलवार घेवून जोरात म्हटले की,तुमच्या सोबत नाही चालणार,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।७।।

गाड करे बोहो भांत ।। संक माने नहि काई ।।
तब सोचो मन माय ।। बुध या अकल उठाई ।।
कर बिच सायब ध्यान ।। नार को अंग बणायो ।।
बदले दीवी जाय ।। आप तब ठोड़ रहायो ।।
करी लाज बोहो भांत ।। आण गुंगट सो ताणे ।।
जन सुखिया वा नर ।। इण्ड को मरम बखाणे ।।८।।

खुप उपाय केल्यावरही त्या बालकाने शंका मानली नाही,तन मनात विचार करुन बुध्दी तसेच अक्कल विचार केला,तसेच परमात्म्याचे ध्यान करुन हाताच्या मध्ये स्त्रीचे शरीर बनवले,जेव्हा स्त्रीला त्याला घेवून जाऊन दिली तेव्हा तो एक जागी थांबला, त्या स्त्रीने खुप प्रकाराने लज्जा केली व पदर काढून घेतला आणि त्या स्त्रीने इंडच्या मर्मचे वर्णन केले.(स्तुती,प्रशंसा)असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।८।।

करम धाह बो उपाय ।। बेण सो केहे सुणावे ।।
सुध बुध करे बखाण ।। पीव सरणागत जावे ।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

च्यारू फेर मिलाय ।। रीज पुरीले जईये ।।
सुध बुध कह बिचार ।। सब श्रेष्ट तुम रहिये ।।
चली मध मन ध्याय ।। जिनस सु आण बताई ।।
जन सुखिया तब मन ।। गुसाई ये बोत सराई ।।९।।

कर्मांचा नाश होण्याचा उपाय वचनाद्वारे सांगून ऐकवला.सुध बुधने वर्णन(स्तुती,प्रशंसा) करुन परमात्म्याच्या शरणात गेले ब्रम्हा,विष्णू,महादेव व शक्तीला पुन्हा भेटून खुषीने पूरीमध्ये घेवून जा सुध बुधने विचार करुन म्हटले की,तुम्ही सर्व चांगले आणि वस्तूला आणून सांगितले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मनाने(मनापासून) परमात्माने खुप छान सांगितले.।।९।।

अंड कियो प्रकास ।। चहुँ दिस दिसा बधाई ।।
चोड़ो क्रोड़ पचास ।। कोस जो जन ठेराई ।।
ता मध बिस्न प्रकास ।। नाभ मे कंवळ चलायो ।।
ब्रम्हा उत्पत जाण ।। पोप डंडी हुये आयो ।।
धायो बोहो प्रकार ।। गेल को छेह न आवे ।।
ब्रम्हा तब सुखराम ।। उलट पाछो फिर धावे ।।१०।।

अंड्याने चारी दिशांमध्ये आपला प्रकाश फैलवला,तो प्रकाश पन्नास करोड योजन पर्यंत फैलला(पसरलेला)होता,त्या प्रकाशात विष्णू प्रकट झाला व विष्णूच्या नाभीतून कमळ निघाले,ब्रम्हाची उत्पत्ती कमळाच्या दांडीत झाली,ब्रम्हा कमळाच्या दांडीत वर चालला परंतु दांडीचा थांग आला नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ब्रम्हा तेव्हा मागे फिरुन गेला. ।।१०।।

पाछो दोडयो बोहोत ।। छेह कहुँ पार न आवे ।।
ब्रम्हा कंपे सरीर ।। मन धिरप नहि खावे ।।
गेब वाज ता होय ।। भेद तां मांय सुणाया ।।
ध्यान बिध सिखाय ।। पीव देखण मे आया ।।
जब मन आई धीर ।। शिष्ट सब माय दिखावे ।।
ब्रम्हा तब सुखराम ।। समज ऊँचा चल आवे ।।११।।

ब्रम्हा मागे खूप चालला परंतु काही पार आला नाही तेव्हा ब्रम्हाचे शरीर कापायला लागले व मनात धैर्य राहिले नाही तेव्हा आकाशवाणीद्वारा भेद सांगितला व ध्यान करण्याची विधि शिकवली तेव्हा ध्यानात परमात्म्याचे दर्शन झाले तेव्हा ब्रम्हाच्या मनाला धैर्य झाले तर कमळाच्या दांडीत सर्व संसार दिसू लागला.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ब्रम्हा तेव्हा वर चालून आला.।।११।।

ब्रम्हा सोच बिचार ।। शिष्ट मन सोबा कीया ।।
तब भृगुटी प्रकास ।। सिवले दर्शण दीया ।।
सगत किया प्रकास ।। बिस्न कूं उवाज सुणाई ।।
परणो मो कुं आप ।। पास मे रहुँ लुगाई ।।
बिस्न सुणत कर जोड़ ।। सगत को बेण सुणायो ।।
जननी कह सुखराम ।। बिस्न सरणागत आयो ।।१२।।

ब्रम्हाने विचारपूर्वक सृष्टी रचण्याचा मनात विचार केला तेव्हा भृगुटीच्या प्रकाशात शिव प्रगट झाला.आता शक्तीने प्रकाश केला तर विष्णूला हा आवाज ऐकू आला की,येवून माझ्याशी विवाह करा,मी तुमची स्त्री बनून राहिल तेव्हा विष्णूने हात जोडून शक्तीला म्हटले की,आपण माझी माता आहे आणि मी आपल्या शरणात आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की ही गोष्ट सांगितली.।।१२।।

कियो भस्म तिण बार ।। जाय ब्रम्हा कूं लीया ।।
परणो मुज कूं आय ।। राज सब तुम कूं दीया ।।
ब्रम्हा सोच मन मांय ।। बेण सो कह सुणाई ।।
तुम माता मे पूत ।। परण केसी बिध आई ।।
जब नटियो तिण बार ।। बिस्न ब्रम्हा कूं मेल्या ।।
सिव पे आय धाय ।। परण संग रह स भेळा ।।१३।।

तेव्हा शक्तीने विष्णूला मिटवून दिले आणि ब्रम्हाच्या जवळ जावून बोलली की, माझ्याशी विवाह करा.हे सर्व राज तुम्हाला देते.ब्रम्हाने विचारपूर्वक शक्तीला सांगीतले की,आपण माझी माता आहे,आपला पुत्र आहे,मी विवाह कसे करु शकतो,जेव्हा ब्रम्हाने विवाह करण्यास नाही म्हटले तेव्हा ब्रम्हाला ही विष्णू सारखे मिटवून दिले व शिवच्या जवळ जावून बोलली की,माझ्याशी विवाह करा,आपण व आम्ही दोघे सोबत राहू. ।।१३।।

शिव सोचो मन माय ।। बिस्न ब्रम्हा सा लीया ।।
मै नटियो तिण बार ।। मोय कुई चूरण कीया ।।
तां मे क्या सुख होय ।। धुंध सूं अकळ उठाई ।।
परणुं गो मै आय ।। बचन बाचा द्यो आई ।।
मेरा बचन निभाय ।। बेण खाली नहि जावे ।।
जन सुखिया कर जतन ।। सब परणे कूं आवे ।।१४।।

शिवने मनात विचार केला की,शक्तीने ब्रम्हा,विष्णूला मिटवून दिले,मी नाही म्हटले तर मलाही मिटवून देईल,याच्यात काय सुख मिळेल,आपल्या बुध्दीने अक्कल उभी केली,

मी तुझ्याशी विवाह जरुर करेल,तु मला वचन दे की,मी तुमच्या वचनाला निभवेल व तुमची आज्ञा खाली जाणार नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, शिवने सांगितले असा प्रयत्न करुन सर्वही विवाह करुन घ्या,शक्तीला सांगितले. ।।१४।।

केहे मुख बचन उचार ।। बेण तेरा सब मानुं ।।
सिव कूं सगत सराय ।। मर्द तोहि कूं जानुं ।।
सिव कह बचन उचार ।। बप दूजो तम धारो ।।
ब्रम्हा बिसन उपाय ।। शिष्ट को करो पसारो ।।
दोन्यु कर पैदास ।। रूप दूजो धर आई ।।
जन सुखिया सिव ऊठ ।। पल्लो गेबाय संभाई ।।१५।।

शक्तीने शिवला सांगितले,मी तुमच्या सर्व वचनांना मानेल तुम्हाला सर्वांना बलवान मर्द समजेल शिवने शक्तीला सांगितले तु दुसरे शरीर धारण कर आणि ब्रम्हा,विष्णूला प्रगट कर सृष्टी पैदा होईल असा उपाय करा तेव्हा ब्रम्हा,विष्णूला प्रगट करुन दुसरे शरीर धारण करुन घेतले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तेव्हा शिवने उठून शक्तीचा हात पकडला.।।१५।।

खेंच चल्या सिव धाय ।। सगत लारे सिर आवे ।।
आप अढळ उण जाग ।। बिस्न कूं पास बुलावे ।।
ब्रम्हा के संग होय ।। बिस्न के संग पठाई ।।
आप रहे मेजूद ।। कळा सुं नार हुय आई ।।
दीयो भेद बताय ।। शिष्ट अेसी बिध करिये ।।
अप तत्त सुखराम ।। ताय सुं धरणी धरिये ।।१६।।

शिव शक्तीचा हात पकडून चालू लागला आणि शक्ती मागे मागे येवू लागली,शिवने अटल स्थानावर थांबवून विष्णूला जवळ बोलावले.ब्रम्हा,विष्णूच्या सोबत शक्तीला पाठवले आपण शिव तेथे राहिला.शक्ती आपल्या कलेने स्त्री बनून गेली तेव्हा म्हटले की, सृष्टीची रचना या विधिने करा,जल(पाणी)तत्वाच्या वर पृथ्वीला थांबवा.।।१६।।

गुंज कियो तब आय ।। तत्त को भेव बतायो ।।
शिष्ट करण सब जीव ।। पीव से धरम ले आयो ।।
हम तुम सब इण माय ।। पांच आप न मज होय ।।
जीव करण बिस्तार ।। सगत सुं संग संजोई ।।
लख चोरांसी जात हे ।। जीव अनंता होय ।।
जन सुखिया इण पांच को ।। बप बणायो जोय ।।१७।।

तेव्हा सर्वांनी मिळून विचार केला,तत्त म्हणजे सतस्वरुप ब्रम्हाचा भेद सांगितला सृष्टी

मध्ये सर्व जीवांना पैदा करण्याचा उपाय सतस्वरुपने धर्मरायाला सांगितला.आम्ही तुम्ही सर्व याच्यात आहे,पाच तत्व आपल्यात आहे,जीवांचा फैलाव म्हणजे विस्तार करण्याकरीता शक्तीला सोबत घेवून घ्या.संसाराच्या रचनेचे काम केले चौऱ्यांशी लाख योनीत असंख्य जीव आहेत.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की पहा(बघा) पाच तत्वांपासून हे शरीर बनवले आहे.।१७।

बाय लाय गेह हात ।। जीव जब जामण दीया ।।
लख चोरासी बप ।। बाय के सरणे कीया ।।
पांच तत्त प्रकास ।। मांड सब जीव उपावे ।।
बाय तेज अप धरण ।। गिगन से पवन ले आवे ।।
ब्रम्हा कूं सब सूंप घडण ।। हुवाला सब दीया ।।
जन सुखिया सिव सगत ।। बिस्न प्रवाणा कीया ।।१८।।

वायु,तत्व व तेज तत्वांपासून जीवांना बनविले आहे चौऱ्यांशी लाख योनींच्या शरीराला वायु तत्व म्हणजे श्वासाच्या शरणात केले.पाच तत्वांचा प्रकाश देवून संसारातील सर्व जीवांना पैदा केले.वायु,तेज,पाणी,पृथ्वी व गगनपासून हवेला घेवून व या सर्वांना ब्रम्हाला सोपवून ब्रम्हाला पैदा करण्याचे काम सोपवले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की,शक्ती,ब्रम्हा,विष्णूने या गोष्टीचा स्वीकार केला.।।१८।।

जाहाँ ब्रम्हा निर धार ।। आर टेको नी कोई ।।
सगत स्याम मिल जाण ।। ब्रम्ह जल सगत समोई ।।
मंड ह जळ पर जाण ।। ताय सिर कोरुम बेठा ।।
धरण सेंस सिर होय ।। सेंस कोंरुम पर पेठा ।।
अेसा जतन बणाय ।। ताय पर शिष्ट पसारा ।।
धरम राय सुखराम ।। समज कर बचन बिचारा ।।१९।।

जेव्हा ब्रम्हाला कोणाचा आधार व सहारा नव्हता.शक्ती आणि श्यामने याला जाणले (ओळखले)ब्रम्ह जलात शक्ती सामाऊन गेली.सर्व पृथ्वी जलावर(पाण्यावर)आहे.जलावर कासव बसले आहे.पृथ्वी शेषनागाच्या शरीरावर आहे आणि शेष कासवावर बसला आहे. असे जतन बनवून त्यावर सृष्टीचा पसारा केला आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तेव्हा धर्मराय समजून वचन बोलले.।।१९।।

तीन लोक चवदे भवन ।। किया देव सब ठाम ।।
धरम ब्रम्ह को बेण ले ।। सुध बुध साऱ्या काम ।।
तिरगुण घड प्रगट करी ।। आप सकळ सिरताज ।।
ब्रम्हा संकर बिस्न कूं ।। दिया मंड का राज ।।

तीना ओधा पेरिया ।। फिर सगती प्रवाण ।।
तिरगुण मे सुखराम केहे ।। तीन देव की आण ।।२०।।

तीन लोक चौदा भवन बनविले व सर्व देवतांना जागच्या जागी बनविले.धर्मरायने सतस्वरुप ब्रम्हची आज्ञेनुसार सुध बुधने काम केले.त्रिगुणी म्हणजे सतोगुण,रजोगुण,तमोगुणाला घडवून प्रगट केले.ब्रम्हा,विष्णू,महादेवाला ब्रम्हांडाचे शक्तीच्या बरोबर ओहदे दिलेत.तीन गुण सतो,रजो,तमो गुणात तिन्ही देवतांची आण आहे.।।२०।।

इतनी उत्पत जाण ।। ब्रम्हा सु धरम बखाणी ।।
ब्रम्हा कूं अब सूंप ।। धरम बोले सत बाणी ।।
दीया सब ले साज ।। जीव सरणागत कीया ।।
ऊँच नीच का न्याव ।। धरम अपने बस लीया ।।
तीन देव कूं सूंपिया ।। लख चोरासी जीव ।।
जन सुखिया रछ्या करो ।। उलट मिलाओ पीव ।।२१।।

धर्मरायाने ब्रम्हापासून जगाच्या उत्पत्तीचे बखाण(वर्णन,प्रशंसा)केले.ब्रम्हाला सर्व सोपवून धर्मराय सत्य वचन बोलला.सर्व तऱ्हेचे साधन देवून जीवांना ब्रम्हाच्या शरणात करुन दिले.चांगल्या वाईट कर्माचे फळ भोगवण्याचे काम धर्मरायने आपल्या जवळ ठेवले. तीन देव म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेवाला चौऱ्यांशी लाख योनींच्या जीवांना सोपवून सांगितले की,यांची रक्षा करा व यांना परत परमात्मा मिळवून द्या.।।२१।।

ब्रम्हा बेद ऊचार ।। जीव कूं गेल बताई ।।
बिस्न पोख प्रवाण ।। भीड़ पर साय कराई ।।
सिव लिया पण आय ।। जोग का भेव बताया ।।
खंड ब्रहमंड का सुत ।। पिंड के माय दिखाया ।।
सगत कहयो तिण बार ।। जीव सब सीव मिलेगा ।।
जन सुखिया इण पास ।। कयो जीव ज्यूं अेक न रेगा ।।२२।।

ब्रम्हाने चार वेदांचे उच्चारण करुन,जीवांना परमात्म्याच्या प्राप्तीचा रस्ता दाखवला.विष्णू जीवांचे पालन करु लागले.कष्ट आल्यावर सहाय्यता करु लागले शिवने अष्टांग योगाचे साधन सांगितले.जे खंड ब्रम्हांडात आहे तेच पिंडात आहे अशी विधी सांगितली.शक्तीने सांगितले सर्व जीव ब्रम्ह मध्ये मिळतील.।।२२।।

सगत लिया पण आय ।। रूप अेसी बिध कीया ।।
ब्रम्ह गेल चुकलाय ।। जीव अपणे बस लीया ।।
माया बोहो प्रकार ।। पाँच ले बाण बणावे ।।
जे कोई मुरड़र जाय ।। बाण सु मार गिरावे ।।

पास्याँ बोहो बिध गुंथिया ।। जीव गेहेण के काज ।।
तीन लोक सुखराम कह ।। जहाँ तहाँ माया राज ।।२३।।

शक्तीने आपले स्वरुप अशा तऱ्हेने बनविले की सर्व जीवांना आपल्या वशमध्ये करुन घेतले.जीव ब्रम्ह प्राप्तीचा रस्ता भुलून गेले शक्तीने अनेक तऱ्हेची माया रचून टाकली. शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध हे पाच बाण शक्तीने बनवले आहे.जे जीव ब्रम्ह प्राप्तीच्या रस्त्याने जातात तर शक्ती बाण मारुन पाडते.जीवांना आपल्या वशमध्ये करण्याकरीता अनेक तऱ्हेच्या फाश्या गुंथून टाकल्या.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले की तीन लोकात जेथे तेथे मायेचे राज्य आहे.।।२३।।

जीव दिया उळझाय ।। पीव लग जाण न पावे ।।
सगत आप बस कीन ।। निसो दिन नाच नचावे ।।
तीन देव सो माय ।। अलख बिन बचे न कोई ।।
देहे धर उपजे जीव ।। सकळ माया बस होई ।।
सुरपुर नरपुर नागपुर ।। माया किया बणाव ।।
जन सुखिया निरखे सबे ।। हरक हरक ले आव ।।२४।।

सर्व जीवांना माया शक्तीने अशा संसारात अडकवले की,कोणीही परमात्म्याची प्राप्ती करु शकत नाही सर्व जीवांना शक्तीने आपल्या वशमध्ये करुन घेतले.रात्र–दिवस आपल्या इच्छेनुसार नाच नाचवते आहे.तिन्ही देव ब्रम्हा,विष्णू,महादेव हे ही माया शक्तीच्या वशमध्ये आहे.निरंजन,निराकार,अलख ब्रम्हच्या शिवाय मायेपासून कोणी वाचले नाही.जो ही जीव शरीर धारण करतो,तो सर्व मायेच्या वशमध्ये होवून जातो.देवतांच्या लोकात मनुष्य लोकात व पाताळात सर्व जागी मायेचा पसारा आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व खुषीने मायेच्या वश होवून जातात. ।।२४।।

निराकार नीर------ ।। दूसरे बींभे चलायो ।।
तीजो आसा धार ।। शिष्ट करणे कूं आयो ।।
ओऊँ शब्द उचार ।। सगत सो आद बणाई ।।
इण मिल इंड उपजाय ।। देव तीनुं घड़ माई ।।
जळ बन कर पैदास ।। पुरष सो पाँच उपायो ।।
जन सुखिया ओ मूळ ।। बिस्न ब्रम्हा बिन गायो ।।२५।।

तेव्हा निंरजन निराकार परमात्म्याने त्याची जी इच्छा होती की,सृष्टीची पुन:(पुन्हा) रचना व्हावी याकरीता ओम शब्दाचे उच्चारण करुन,परमात्म्याने शक्तीला बनविले. निराकाराने इंड पैदा केले व या इंडातून ब्रम्हा,विष्णू,महादेवाला पैदा केले.जल वनस्पती व पाच तत्वापासून पुरुष पैदा केले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, हा मूळ

उत्पत्ती ग्रंथ ब्रम्हा व विष्णूच्या शिवाय सांगितला आहे.।।२५।।

मूळ प्राण परतीत ।। अलख हे आद गुसाई ।।
गुर बिन लखे न कोय ।। शाम रमत सब भाई ।।
सत्तगुर बिना आधार ।। निरख नेणा नहि सूझे ।।
भरम रया सब जीव ।। पीव गेलो नहि बूजे ।।
सत्तगुर धर अवतार ।। जीव कूं आण जगावे ।।
उपराड़े की गेल ।। ताय हुय हंस ले आवे ।।२६।।

मूळात जे पाच तत्वात जो प्राण प्रतीत होवून राहिला आहे,तो त्या अलख अविनाशीचाच अंश आहे.तोच श्याम सर्व घटात रमून राहिला आहे परंतू त्याला ओहदाधारी गुरुदेवा शिवाय पाहू शकत नाही.या नेत्रांनी त्याला पाहू शकत नाही.सर्व जीव माया व ब्रम्हमध्ये अडकलेले आहेत परमात्म्यामध्ये मिळण्याचा रस्ता सुजत नाही त्याकरीता परमात्मा असे ओहदाधारी सतगुरुंना पाठवतात.ते जीवांना ज्ञानाच्याद्वारे जागवितात.खंड,पिंड, ब्रम्हांडाचे छेदन करुन हंसाला परमात्म्या मध्ये मिळवून देतात.।।२६।।

मूळ प्राण एतो कयो ।। सुणो सकळ चित्त लाय ।।
भिंन भिंन अरथ बिचार कर ।। साच गहो जन आय ।।
जांथे उत्पत ऊपनी ।। सो करतार बखाण ।।
उली देखा भूल मे ।। जाहाँ ताहाँ खाचा तांण ।।
पूरण पुरा गुर मिले ।। मूल केहे सब आय ।।
जन सुखिया तब जीव का ।। भरम करम सब जाय ।।२७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी मूळ प्राण उत्पत्ती ग्रंथ सांगितला आहे.त्याला सर्व चित्त लावून ऐका.या ग्रंथात वेगवेगळ्या अर्थाचा विचार करा.भक्ती करणारे जन सत्याला धारण करा,ज्याने या जगाला रचले आहे,तो सृष्टीकर्ता आहे.ब्रम्हा, विष्णू,महादेव व अवतारांच्या भक्तीत लागून सतस्वरुप ब्रम्ह प्राप्तीच्या ज्ञानाला विसरत आहेत याच्यात जेथे तेथे वाद विवाद आहे.परमपदाची प्राप्ती केलेले पूर्ण सतगुरु मिळाल्यावरच मूळ प्राण उत्पत्तीचे सर्व बखाण(वर्णन,प्रशंसा)करतात.आदि सतगुरु सुखरामजी सांगतात की,जेव्हा ही जीवाचे सर्व भ्रम,कर्माचा नाश होतो.।।२७।।

ब्रम्हा की उत्पत उरे ।। इतनी परे बखाण ।।
अे बंधन पेली बाध ।। जव प्रगट प्रवाण ।।
ब्रम्हा सुं कासब भयो ।। चवदे नार बियाय ।।
च्यार खान प्रगट करी ।। सकळ जीव जग माय ।।
सकळ जीव जुग माय ।। राज ब्रम्हा को कर हे ।।

कृत जुग मध सुखराम ।। नाम बरण नहि धर हे ।।२८।।

ज्या रीतिने ब्रम्हाचे शरीर बनले याच रीतिने पंचतत्व व तीन गुणांनी सृष्टी बनली. ब्रम्हापासून कश्यप झाला,ज्याच्या चौदा स्त्रिया झाल्यात.त्यांनी चार खाणीत जगतील जीवांना बांधले.मूळात हे सर्व त्या परमात्म्याच्या हुकुमाचे पालन करीत आहेत.त्या परमात्म्याचे कोणते नाव,वर्ण,रुप नाही आहे.।।२८।।

।। इति मुळ प्राण उत्पत ग्रंथ को अंग संपूरण ।।